# अस्पृश्यता निवारण विषयक महात्मा गांधी , स्वातंत्र्यवीर सावरकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

**डॉ अरुण योगेश्वर जाधव** सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग र भा माडखोलकर महाविद्यालय, चंदगड.

---

**प्रस्तावना :-** भारतात रागरं मोहन रॉय यांच्या पासून समाज सुधारणेला सुरुवात झाली. महाराष्ट्रात मात्र याचा आरंभ संत परंपरेपासून झाला. ज्ञानेश्वर एकनाथ तुकाराम महाराज यांनी अध्यात्मापासून समतेचा संदेश दिला. १९ व्या शतकात महात्मा फुले शाहू महाराज नामदार गोखले न्यायमूर्ती रानडे सुधारक आगरकर इत्यादींनी प्रत्यक्ष कृतीतून जातीनिर्मुलनलातून समतेचा संदेश दिला. परंतु या सर्व प्रयत्नांना अस्पृश्यता निर्मूलनाचा राष्ट्रीय पातळीवरील प्रश्न म्हणून मान्यता मिळालेली नव्हती . १९३२ मध्ये झालेल्या पुणे करारामुळे अस्पृश्यता हा हिंदू धर्मातील कलंक असून त्याचे निर्मुलन झाले पाहिजे याबाबत एकमत झाले. असृश्यता हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर चर्चिला गेला.

असृश्यता निर्मुलानाबाबत महात्मा गांधीजी, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यात तीव्र मतभेद होते. तरीसुद्धा अस्पृश्यता निर्मुलन करून सामाजिक समता प्रस्थापित झाली पाहिजे. याबाबत एकमत होते. म्हणून या तिन्ही नेत्यांचे अस्पृश्यता निवारण विषयक विचार अभ्यासने महत्त्वाचे ठरते**.**

**1.2 उद्देश** :- 1) हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि अस्पृश्यतेचा अर्थ अभ्यासणे.

2) पुणे कराराचा थोडक्यात आढावा घेणे.

3) महात्मा गांधीजी ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यां चे अस्पृश्यता निवारण विषयक विचार अभ्यासणे.

1.**3 संशोधन पद्धती :-** या शोध निबंधासाठी महात्मा गांधीजी ,स्वातंत्र्यवीर सावरकर आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली पुस्तके ,लेख विविध विचारवंतानी लिहिलेली पुस्तके, लेख यांचा आधार घेतला आहे. पूर्णतः दुय्यम तथ्य सामग्रीवर आधारलेला आहे.

1.**4 हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्था आणि अस्पृश्यता :--**

हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य ही एक सामाजिक विभाजनाची व्यवस्था होती. तिने संपूर्ण हिंदू समाज ब्राह्मण,क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णामध्ये विभागाला होता. या व्यवस्थेने जन्मावर आधारित वर्ण ठरविला .वर्ण व्यवस्थेने श्रम विभागणी होते असे भासविले जात होते. परंतु या व्यवस्थेने जातिभेदाच्या भिंती उभा केल्या होत्या.

ब्राह्मण ,क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्ण पासून शुद्र वर्णाला अलिप्त ठेवून अस्पृश्य ठरविले. एका माणसाने दुसर्या माणसाला स्पर्श नाकारणे म्हणजे अस्पृश्यता होय.शुद्र माणसाने इतर कोत्याही जातीतील माणसाला स्पर्श करणे पाप किवा विटाळ मानला जात होता. हिंदू धर्मातील या अमानवी पद्धतीने अस्पृश्य लोकांना गुलागिरी पेक्षा भयंकर जीवन जगावे लागत होते. ही बाब कोणत्याही मानवतावादी विचारवंताला नपटणारी होती. महाराष्ट्रातील पेशवाई काळात जातिभेदाचा आणि अस्पृश्यतेचा कळस गाठला होता. अस्पृश्यतेला अमानवी स्वरूप आले होते. भारतात अनेक समाज सुधारकांनी अस्पृश्यता आणि जातीभेदाचे निर्मुलन करण्याचा प्रयत्न केला. परंतु स्वातंत्र्याच्या ७५ नंतरही या प्रश्नाचे समूळ उच्चाटन झालेले नाही. ही वस्तुस्थिती आहे. ही आमची स्वतंत्र भारतीयांची शोकांतिका आहे. जीकाही थोडी कमी झालेली आहे. त्याचे श्रेय महात्मा गांधीजी ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांना दिले पाहिजे.

**1.5 पुणे करार** :- 1931च्या अखेरीस ब्रिटीश सरकारने दुसर्या गोलमेज परिषदेमध्ये अस्पृश्यांना स्वतंत्र राखीव जागा देण्याचा ठराव केला. या ठरावाला विरोध म्हणून महात्मा गांधीजीनी येरवडा जेल मध्ये आमरण उपोषण सुरु केले. महात्मा गांधीजीची तब्बेत बिघडली होती . तेव्हा तडजोड म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर ,प.मदनमोहन मालवीय ,जयकर, सी गोपालचारी ,इ. नी महात्मा गांधीजी समवेत चर्चा करून करार केला त्यालाच पुणे करार किवा ऐक्य करार असे म्हणतात .या करारानुसार दलित वर्गासाठी प्रांतिक सभेसाठी १४८ जागा राखीव ठेवण्याचा निर्णय झाला. केंद्रीय कार्यकारणी मध्ये १८% जागा राखीव ठेवण्याचा निर्णय झाला. परिणामतः सनातनी विचाराचे गांधीजी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रमाणेच अस्पृश्यता आणि जातीभेद या अमानवी कृती मानू लागले.

1.6.1 **महात्मा गांधीजींचे अस्पृश्यता निवारण विषयक विचार** :--सुरुवातीच्या काळात महात्मा गांधीजी हे स्वतःला सनातनी हिंदू मनात होते . त्यामुळे त्यांना हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य व्यवस्था मान्य होती. त्यांच्या मते, जाती व्यवस्था ही श्रम विभागणीसाठी आणि समाजव्यवस्था कायम राखण्यासाठी आवश्यक आहे. जाती व्यवस्था ही जन्मावर आधारित नसून ती गुणकर्मावर आधारित आहे. परंतु जेव्हा सत्यांश त्यांच्या लक्षात आला. तेव्हा त्यांनी चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा निषेध केला नाही तर टी पूर्णतः नाकारली.त्यापुढे जावून त्यांनी अस्पृश्य- स्पृश्य यांनी एकत्रित जेवण करावे,समाजाने एकत्रितपणे काम करावे.असे जातीनिर्मुलानाचे कार्यक्रम हाती घेतले. त्यांनी असेही जाहीर केले की , समाजात आंतरजातीय विवाह करावेत ,ते स्वतः सजातीय विवाहास उपस्थित राहणार नाहीत. हा विचार त्यांनी पुढे कायमपणे सांभाळला. त्यांचे निकट वर्तीय महादेव भाई देसाई यांच्या चिरंजीवाच्या विवाहास साजातीय्तेचे

कारण सांगून उपस्थित राहिले नाहीत. पुणे करारावेळी अस्पृश्य धोरणाला विरोध केला होता. पण त्यापुढे त्यांनी अस्पृश्यता निवरणाला चालना दिली. गांधीजींच्या प्रभावामुळे सामुदाईक भोजनाचे कार्यक्रम झाले. अयोध्या, काशी, कोल्हापूर इ .ठिकाणची मंदिरे अस्पृश्यांना खुली करण्यात आली. अस्पृशाना लोकांनी स्वीकारावे म्हणून त्यांनी हरिजन हा शब्द दिला. त्यांच्या मते, अस्पृश्यता नष्ट होवून समताधीस्थित समाज निर्माण व्हावा. अशी त्यांची धारणा होती.

**1.6.2 स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांचे अस्पृश्यता निवारण विषयक विचार:-**

स्वातंत्र्यवीर सावरकर हे स्वातंत्र्य लढ्यातील अग्रगण्य नाव. त्यांनी १९१९ मध्ये हिंधू महासभेची स्थापना करून हिंधुत्त्वाचा कट्टर पुरस्कार केला. परंतु त्यांचा हिंदुत्त्वाचा विचार हा सनातनी नव्हता तर तो विज्ञान निष्ठ होता. हिंदू धर्मातील काही प्रथा ,परंपरा, अनिष्ट रूढी याबाबत ते कातोर शब्दात आपली भूमिका मांडत असत. त्यांना अस्पृश्यता आणि जातीभेद मान्य नव्हता. अस्पृश्यता हा कलंक असून तो दूर केला पाहिजे. या विचाराचे होते. त्यांनी हळदीकुंकू तिळगुळ वाटप सामुदाईक भोजन यासारखे कार्यक्रम दलित बांधवाना साबोत घेवून केले. सहभोजनाच्या वेळी जाती-जातीतील दोष दाखवत असत. वैयक्तिक स्वच्छता इ.बाबत उपदेश करीत. पुणे करारापुर्वीच म्हणजे १९३१ मध्ये रत्नागिरी येथे सर्व जाती,धर्मातील लोकांसाठी पतितपावन मंदिर उभारले. त्यांनी नुसता मंदिर प्रवेश दिला नाही तर मंदिरातील मूर्ती पूजेचा मान देखील मिळवून दिला. त्यांनी स्वातंत्र्याच्या लढयाबरोबरच हिंधू धर्मातील अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. त्यांच्या मते, हिंदू धर्मातील जातीयता संपून समता निर्माण झाली पाहिजे.

**1.6.3 डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अस्पृश्यता निवारण विषयक विचार:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कुशाग्र बुद्धीच्या आणि स्वयंभू व्यक्तिमत्वाच्या बळावर दलित समाजाचे सर्वोच्य नेते झाले.सामाजिक अन्यायाखाली वर्षानुवर्षे पिचलेल्या समाजाचे डॉ. बाबासाहेब हे उद्धारकर्ते होते. आपला समाज इतर हिंदू समाज्याप्रमाणे शस्त्र हाती घेवून क्रांती करणारा नसावा.तर तो सत्याच्या मार्गाने अन्यायाविरूध्द लढणारा असावा. असे त्यांचे मत होते. बाबासाहेबांनी अस्पृश्यता आणि जातीभेद निर्मुलनासाठी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी सत्याग्रह केला. बहिष्कृत भारत मूकनायक यासारख्या वृत्तपत्रातून सामाजिक विषमता, अस्पृश्यता ,जातीभेद आणि अनिष्ठ परंपरा यावर कठोर शब्दात प्रहर केला. त्यांनी नेहमी समतेच्या तत्वांचा पुरस्कार केला. येवल्याच्या सभेतून त्यांनी "हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मारणार नाही" अशी घोषणा करून धर्मांतराचा विचार मांडला. पुढे जावून १९५६ मध्ये हिंदू धर्म त्यागून बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. सामाजिक विषमता मूलक हिंदू धर्म सोडून समता पुरस्कृत बौद्ध धम्म स्वीकारला. त्यामुळे समाजात जागृती निर्माण होऊन धर्मांतर ही सुद्धा एक चळवळ बनली. लाखो अनुयायी दर वर्षी हिंदू धर्म सोडून बौद्ध धम्माची दीक्षा घेत आहेत. डॉ.बाबासाहेंबांचे सामाताधीस्थित विचारधारा स्वतंत्र भारताला सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा ठरली. भारतातील शोषित ,वंचित पिडीत अस्पृश्य समाजाला जागृत करून स्वाभिमानी जीवन जगण्याचा विचार दिला. हजारो वर्षे कुंठीत जीवन जगलेल्या समाज्याला मानवी जीवनातील विषमतेचा विळखा दूर करून अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. तत्कालीन हिंदू धर्मातील प्रकांड पंडितांनी राजकारण्यांनी कट्टरता वाद्यांनी सनातन वाद्यांनी बाबासाहेबांच्या अस्पृश्यता आणि जातीभेद निर्मूलनाच्या कार्याला कडाडून विरोध केला होता. परंतु बाबासाहेब हे प्रकांड पंडितांना पुरून उरले होते. त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत अस्पृश्यता निर्मुलन आणि जातीभेद निवारणाचे कार्य केले. पुणे करारात महात्मा गांधीजीची भूमिका त्यांना मान्य नव्हती .त्यांनी तडजोड म्हणून पुणे करारावर सही केली होती. त्यांना राजकीय स्वन्तान्त्र्या इतकेच सामाजिक समतेचे स्वातंत्र्य हवे होते.बाबासाहेबांनी नेहमी सामाजिक दृष्ट्या पिचलेल्या लोकांकरिता काम केले. सामाजिक समतेशिवाय राजकीय स्वातंत्र्य निष्फळ ठरेल .असी त्यांची धारणा होती.जेव्हा-जेव्हा सामजिक समतेचा विचार मांडला जाईल तेव्हा –तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार विचारात घ्यावे लागतील. ही महानियाता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आहे.

**1.7 सारांश :-** अस्पृश्यता हा हिंदू समजा लागलेला कलंक आहे. अस्पृश्यता निअवरण मुळातून झालेच पाहिजे. समाजात एकता आणि समता प्रस्थापित झाली पाहिजे. याबाबत महात्मा गांधीजी, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एकमत होते. मात्र अस्प्रश्यता निवारणाचा मार्ग वेगळा होता. महात्मा गांधीजी राजकीय स्वातंत्र्याला प्रथम प्राधान्य देत होते. तर बाबासाहेब आंबेडकर हे राजकीय स्वातंत्र्यापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याला अधिक महत्त्व देत होते. देशाच्या दृष्टीने राजकीय आणि सामाजिक स्वातंत्र्य दोन्ही मुल्ये महत्त्वाची होती .आज राजकीय स्वातंत्र्य मिळाले असले तरी सामाजिक समता प्रस्थापित झालेली नाही. म्हणूनच महामत गांधीजी, स्वातंत्र्यवीर सरकार आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्त्वाचे आहेत.

**संदर्भ सूची :-**

1. महात्मा गांधी – हिंद्स्वराज
2. महात्मा गांधी ---माझे सत्याचे प्रयोग
3. महात्मा गांधी---यंग इंडिया ,हरिजन
4. स्वातंत्र्यवीर सावरकर ---हिंदू राष्ट्र दर्शन
5. धनंजय कीर ---स्वा. सावरकर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर
6. डॉ बाबासाहेब आंबेडकर –शुद्र पूर्वी कोण होते ?
   डॉबाबासाहेब आंबेडकर ---मूकनायक ,बहिष्कृत भारत.